# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:14.12.2025** **वार:रविवार**

---

1. मुंबईत 50 एकरपेक्षा मोठ्या भूखंडांवर 'क्लस्टर पुनर्विकास'; पहिल्या टप्प्यात 17 प्रकल्पांची निवड
2. राज्य शासनाच्या पीएचडी शिष्यवृत्तीसाठी वितरण मर्यादा आणि गुणवत्तेचे निकष ठरवण्यात येणार
3. राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाचं उद्घाटन आणि
4. जुन्नर वन विभागात 68 बिबटे जेरबंद

**<u>झोपडपट्टी</u>**

मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पामधील लाभार्थ्यांना दिलासा देणाऱ्या अनेक महत्वपूर्ण घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल विधानपरिषदेत केल्या. त्यामध्ये प्रामुख्यानं मुंबईला झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी 17 ठिकाणी एसआरए समुह पुनर्विकास प्रकल्पासोबतच 'एसआरए अभय योजने'ला डिसेंबर 2026 पर्यंत मुदतवाढ, तक्रारींच्या जलद निपटाऱ्यासाठी समित्यांची संख्या वाढविण्याच्या घोषणांचा समावेश आहे.

त्याचबरोबर म्हाडाच्या ओसी म्हणजे भोगवटा प्रमाणपत्रासाठी अभय योजनेला एक वर्षाची मुदतवाढ आणि मुंबई महापालिकेच्या लिज प्लॉटवरील महापालिका कर्मचाऱ्यांनी बांधलेल्या घरांकरीता नवीन योजना करण्याची घोषणा देखील त्यांनी केली. शिंदे यांनी सांगितलं की, 50 एकर किंवा त्यापेक्षा मोठ्या खासगी, शासकीय किंवा निमशासकीय जमिनींवर आता एकत्रितपणे झोपडपट्टी पुनर्विकास योजना करण्यात आली आहे.

**<u>फनेल झोन</u>**

संरक्षण क्षेत्रालगतच्या आणि फनेल झोनमधील मर्यादांमुळे रखडलेल्या इमारतींचा पुनर्विकास सुलभ करण्यासाठी राज्य शासनानं 'हाउसिंग फॉर ऑल' ही नवी योजना आणल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभा आणि विधानपरिषदेत निवेदनाद्वारे सांगितले. या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी 300 चौरस फुटांपर्यंतचा एफएसआय विनामूल्य देण्यात येणार आहे. तसंच कमकुवत घटकांसाठी 600 चौरस फुटांपर्यंतच्या सदनिकांची पुनर्बांधणी विनाशुल्क व्हावी, अशी तरतूद करण्यात आली आहे. यासाठी आवश्यक असलेला इन्सेंटिव्ह एफएसआय देय राहणार असून मूळ जमीनमालकांचा मूलभूत एफएसआयचा हक्क अबाधित ठेवण्यात येणार आहे.

**<u>अजित-पवार-विधीमंडळ</u>**

राज्य शासनाच्या बार्टी, सारथी आणि महाज्योती संस्थांमार्फत पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी लक्षांक ठरविण्यात येणार असून गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत दिली. या संस्थांची शिष्यवृत्ती 3 वर्षांपासून रखडली असल्याचा प्रश्न सदस्य नितीन राऊत यांनी विचारला होता, त्यावर ते बोलत होते. योग्य निकषांसह मार्गदर्शक तत्वं निश्चित केली जातील, असं सांगताना ते म्हणाले.....

**<u>पार्टी, बार्टी, महाज्योती, सारथी, अमृत ह्या वेगवेगळ्या संस्था वेगवेगळ्या घटकातल्या मुलांना मुलींना शिक्षणाच्या दृष्टिकोनातून मदत करायला काढलेले आहेत. असे काही विषय निवडले गेलेले आहेत. त्या मुलांना द्यायचं काही काही ठिकाणी एकाच परिवारातले बेचाळीस पंचेचाळीस हजार रुपये मिळतात म्हंटल्यानंतर पाच पाच लोकं पीएचडी करायला</u>**

**लागलेत. आणि मी माहिती घेतली तर, या ठराविक विद्यार्थ्यांच्या करता कित्येकशे कोटी रुपये जातायत. आता त्याच्यामध्ये कॅबिनेट मध्ये याच्याबद्दलची खूप साधक बाधक चर्चा झाली. शेवटी कॅबिनेट ने हा निर्णय घेतला की एक कमिटी नेमायची चीफ सेक्रेटरी च्या अध्यक्षतेखाली आणि साधारण पार्टी च्या किती विद्यार्थ्यांना मेरिट च्या दरवर्षी याच्याकरता एडमिशन द्यायची सारथीच्या किती विद्यार्थ्यांना द्यायची त्याला आम्ही लिमिट घालणार आहे. त्यात पण आपण मेरिट लावतोय.**

**पणन विकास**

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन विकास आणि विनियमन सुधारणा विधेयक 2025 विधानसभेत आणि विधानपरिषदेत काल मंजूर झालं. शेतकऱ्यांच्या शेतमालाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर जलद गतीने पुरवठा साखळी विकसित करून बाजारपेठ मिळवून देण्यासाठी हा कायदा महत्त्वाचा आहे. एकाच परवान्याच्या आधारे राज्यातल्या सर्व बाजारपेठांमध्ये व्यवहार करता येतील. तसंच इतर राज्यांत जारी केलेला परवाना सुद्धा राज्यात वापरता येईल. वार्षिक किमान 80 हजार मेट्रिक टन उलाढाल असलेल्या तसंच 2 राज्यांतून आवक असलेल्या बाजार समितीला याद्वारे राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार हे मानांकन मिळेल.

**अधिवेशन-समारोप**

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर काल चर्चा सुरु झाली. राज्यातील विविध गंभीर समस्यांवरून सत्ताधारी पक्षावर विरोधकांनी जोरदार टीका केली. शेतकरी आत्महत्या, कृषी क्षेत्रातील निधीचा अपव्यय, ढासळलेली कायदा आणि सुव्यवस्था, तसेच भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवरून काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी अंतिम आठवड्याच्या प्रस्तावावर बोलताना टिका केली. विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा आज समारोप होत आहे.

**मुख्यमंत्री**

कृषी क्षेत्राच्या विकासासाठी शेतकऱ्यांचा क्षमता विकास करून प्रक्रिया उद्योगासह इतर संलग्न क्षेत्राशी त्याची बृहद जोडणी करण्यात येईल. यासाठी आवश्यक धोरण तयार करण्यात येईल आणि आवश्यक निधी राज्य शासनाकडून देण्यात येईल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर इथं केलं. भारतीय उद्योग परिसंघाच्या वतीनं 'भविष्याभिमुख महाराष्ट्रासाठी कृषी क्षेत्राचे कृषि उद्योगात रूपांतर : मूल्यवर्धन, नवोन्मेष आणि गुंतवणूक'या विषयावर आयोजित अन्न परिषदेचं उद्घाटन करताना ते बोलत होते. ते म्हणाले ....

**या प्रोसेसिंगमुळे एक प्रकारे शेतकऱ्याचा फायदा झालेला आहे. आता तर आपण पाहतो की साखर कारखानदारीच्या क्षेत्रामध्ये कंप्लीट सर्क्युलर इकॉनॉमी तयार झाली आहे. पूर्वी केवळ मोलासेस आणि डिस्टलरी पर्यंत आपण गेलो कोजिनमध्ये गेलो आता इथेनॉल आहे त्याच्या पलीकडे स्पेंट वॉशमधनं आता मिथेनचं जनरेशन म्हणजे सगळ्या प्रकारचे जे काही बाय प्रॉडक्ट्स आहेत आणि जे काही वेस्टेज होतं त्या सगळ्यावर आता प्रक्रिया करून ज्यांनी सगळे बाय प्रॉडक्ट घेतले आहेत असे कारखाने आज मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना फायदा देताना आपल्याला पाहायला मिळतात.**

**बुक फेस्ट**

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीनं आयोजित पुस्तक महोत्सवाचं उद्घाटन काल पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आलं. यावेळी केंद्रिय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू सुरेश गोसावी, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे मिलिंद मराठे, संयोजक राजेश पांडे, यशस्वी समूहाचे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. हा महोत्सव येत्या 21 तारखेपर्यंत सुरु राहणार आहे.  या महोत्सवात पुस्तक प्रकाशकांनी आठशे दालनं स्थापन केली आहेत. या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील म्हणाले.....

**मुळामुठेच्या काठी हा ज्ञानयज्ञ या पुणे बुक फेस्टिव्हल च्या निमित्तानं तुम्ही हा जो थाटलेला आहे आणि आता आठशेहून अधिक बुक स्टॉल या ठिकाणी आलेले आहेत आणि सगळं परिसर हाउसफुल झालेलं आहे. आता मला काल परवा कुणीतरी सांगितलं की कवटे मांकाळ आणि जत तालुक्यामध्ये छोट्या ग्रामपंचायती आहेत आणि त्या ग्रामपंचायतीने आता नियम केलेला आहे की संध्याकाळी, सात नंतर रात्री अकरा पर्यंत लहान मुलांच्या हातचे मोबाईल काढून घ्यायची आणि त्यांनी सक्तीनं अभ्यास करायचा किंवा ग्रंथाचं वाचन करायचं. तुम्हाला उत्तम ज्ञान मिळवायचं असेल तर ग्रंथाला पर्याय नाही. नव्व्याण्णव व्या साहित्य संमेलनाचा नियोजित अध्यक्ष म्हणून पुणे बुक फेस्टिव्हल सारख्या नितांत सुंदर आणि भारतीय पातळीवर, अरूढ झालेल्या आणि कदाचित याच्यामुळं पुणे नगरी ही जगातली पुस्तकांची पंढरी ठरणार आहे.**

**बिबटे**

पुण्यानजिक जुन्नर वन विभागात वाढलेला बिबटयांचा वावर कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात आल्या. त्याअंतर्गत पिंजऱ्यांच्या मदतीनं आतापर्यंत 68 बिबटे वन विभागानं पकडले आहेत. उपवन संरक्षक प्रशांत खाडे आणि महादेव मोहिते यांच्या विशेष प्रयत्नांचं हे यश असल्याचं पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी काल सांगितलं. जुन्नर वन विभागात जुन्नर, ओतूर, शिरुर, घोडेगाव, मंचर, राजगुरुनगर आणि चाकण वनपरिक्षेत्राचा समावेश होतो. गावांमध्ये वनकर्मचाऱ्यांनामार्फत गस्त, नागरिकांचं प्रबोधन, स्थानिक लोकांच्या सहभागातून जलद बचाव पथकांची निर्मिती, कलापथकाच्या माध्यमातून वेगवेगळ्या गावांमध्ये आणि शाळांमधून जागृती करण्यात आली अशी माहिती डुडी यांनी दिली.

**शिवराज-पाटील-चाकूरकर-लातूर**

माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिव देहावर लातूर शहराजवळील वरवंटी इथं काल शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, यांच्यासह सर्वपक्षीय नेते आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**हवामान**

राज्याच्या अनेक भागांमध्ये थंडीची हुडहुडी भरलेली आहे. आज हवामान सूर्यप्रकाशयुक्त कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.